MHKO100000542008

**नियमीत दिवाणी दावा क्र. ११/२००८**

भैरु कांबळे-म.वा.- वगैरे.
विरुध्द
सखाराम कांबळे-म.वा.- वगैरे.

**निशाणी क्र. ९८ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.२ गणपती राघू कांबळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होणेसाठी व दावा अवसानाचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे नि.९९ वरील अर्जावरच दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, प्रतिवादी क्र.२ गणपती राघू कांबळे हे दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मयत झालेले आहेत व प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ११/०७/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे वादीने, प्रतिवादीच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांमध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत प्रतिवादीविरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल.

०३. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत वादी यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांचे असे कथन आहे की, वादी हे आपल्या शेतीच्या कामात व्यस्त असलेने व त्यांना मुदतीत मयताचे वारस अभिलेखावर आणावे लागतात याचे कायदेशीर ज्ञान नसलेने त्यांना वेळेत आपल्या वकीलांची भेट घेऊन मयताचे वारस मुदतीत अभिलेखावर आणता आले नाहीत. तसेच, वादी यांचे वकील एस.व्ही.पोवार हे ब्रेन स्ट्रोकने आजारी पडलेने त्यांना उपचारासाठी कोल्हापूर येथे

दाखल करावे लागलेने सदरहू कामाची तारीख वादी यांना समजुन आली नाही. तसेच, प्रतिवादी क्र.२ यांचा मृत्यू दाखला मुदतीत प्राप्त झाला नाही. त्यामुळे, त्यांना वारस अभिलेखावर आणणेसाठी विलंब झालेला आहे अशी कारणे नमुद केलेली आहेत. सदर कारणे व विलंबाचा काळ पाहता वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारणे ही संयुक्तीक होत नाहीत. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. त्यामुळे, त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादी यांचेवर अर्जाचा खर्च ठेवून त्याची भरपाई प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१. अर्ज रक्कम रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. प्रतिवादी क्र.२ गणपती राघू कांबळे यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2024.07.31 17:39:17 +0530

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ३०/०७/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 30/07/2024 |
| Order signed by P.O. on | 30/07/2024 |
| Order uploaded on | 31/07/2024 |